म्हाडा
MHADA

छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

(म्हाडाचा प्रादेशिक घटक)

माहिती पुस्तिका



म्हाडा गृहनिर्माण योजना व २०% सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेअंतर्गत प्राप्त सदनिका/गाळे/भूखंडाची संगणकीय सोडत

ऑगस्ट -२०२६



छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, महावीर चौक, छत्रपती संभाजीनगर - ४३१००१

म्हाडा-प्रत्येकाच्या गृहस्वप्नपूर्ततेसाठी कटीबद्ध असलेली आपली हक्काची संस्था.



मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य



मा. ना. श्री. एकनाथ शिंदे
उप मुख्यमंत्री तथा मंत्री, गृहनिर्माण,
महाराष्ट्र राज्य



मा. ना. श्रीम. सुनेत्रा पवार
उप मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य



मा. डॉ. श्री. पंकज भोयर
गृहनिर्माण राज्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य



मा.श्री.असिमकुमार गुप्ता (भा.प्र.से.)
अप्पर मुख्य सचिव गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र राज्य



मा. श्री. संजीव जयस्वाल (भा. प्र. से.)
उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
म्हाडा प्राधिकरण



श्री. वैभव केदारे
मुख्य अधिकारी,
छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

मनोगत

म्हाडा ही गृहनिर्माण क्षेत्रातील सर्वसामान्य जनतेच्या घरांचे स्वप्न पूर्ण करणारी अग्रगण्य संस्था आहे.विविध उत्पन्न गटातील नागरीकांसाठी वाजवी किंमत व उत्कृष्ट दर्जा असलेली घरे बांधण्यासाठी कार्यरत असणारी संस्था असा म्हाडाचा नावलौकीक आहे.सर्वसामान्य जनतेचे घराचे स्वप्न साकारण्यासाठी छत्रपती संभाजीनगर मंडळाची ऑनलाईन सोडत प्रसिध्द करण्यासाठी मला मनस्वी आनंद होत आहे.

छ.संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ तसेच नाशिक मंडळ यांनी आतापर्यंत त्यांच्या कार्यक्षेत्रातील जिल्ह्यातील विविध योजनेत निवासी सदनिका/गाळे/भुखंड तसेच अनिवासी भुखंडाचे यशस्वीरीत्या वितरण केलेले आहे.

माहे ऑगस्ट-२०२६ मध्ये छ.संभाजी नगर मंडळाची ऑनलाईन सोडतीसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात येत असून त्यात छत्रपती संभाजीनगर मंडळातील म्हाडा गृहनिर्माण योजनेअंतर्गत २ बैठे गाळे (घर) व १०५ भुखंड तसेच २०% सर्वसमावेशक योजनेंतर्गत ९७ सदनिका अशा एकुण **२०४** निवासी सदनिका/निवासी गाळा/निवासी भुखंडाच्या संगणकीय सोडतीसाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशनचा शुभारंभ सॉफ्टवेअर प्रणाली IHLMS २.० नुसार होणार आहे. IHLMS २.० या सॉफ्टवेअर प्रणालीमुळे नागरीकांना घरबसल्या वेबसाईट किंवा मोबाईल ॲपच्या माध्यमातून रजिस्ट्रेशन, अर्ज भरणे व ऑनलाईन पेमेंट या सुविधा उपलब्ध होणार आहेत.

सदर ऑनलाईन सोडत संपुर्णपणे पारदर्शी असून म्हाडाने कोणत्याही एजंटची नेमणुक केलेली नाही.संगणकीय सोडतीमध्ये कोणताही मानवी हस्तक्षेप होऊ शकत नाही, त्यामुळे अर्जदारांना असे आवाहन करण्यात येते की, सर्व प्रक्रिया ऑनलाईन स्वरुपाची असून अर्जदारांनी सदर ऑनलाईन सोडतीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा ही विनंती.

स्थळ :- छ.संभाजीनगर. **मुख्य अधिकारी**

दिनांक :- २८/०८/२०२६ **छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ**

छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

अनुक्रमणिका

अ.क्र	तपशिल	पृष्ठ क्रमांक
१.	सोडतीचे वेळापत्रक	५
२.	विविध योजनांचा माहिती तक्ता	६ ते ९
३.	पात्रतेच्या अटी	१० ते ११
४.	संगणकीकृत अर्ज करण्याची कार्यपध्दती	१२ ते १४
५.	संगणकीकृत सोडतीची कार्यपध्दती	१५ ते १७
६.	आरक्षित गटाचे नाव त्याचे विवरण व आवश्यक प्रमाणपत्रे	१८ ते २३
७.	सर्वसाधारण तसेच विशेष अटी व शर्ती	२४ ते २८
८.	सदनिका वितरणाच्या इतर महत्वाच्या अटी	२९ ते ३०
९.	अर्जदारांनी सादर करावयाच्या प्रमाणपत्राचे नमूने	३१ ते ३८
१०.	संपर्क क्रमांक	३९
११	सावधानतेचा इशारा	४०

सोडतीचे वेळापत्रक

छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

म्हाडा गृहनिर्माण योजना व सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेअंतर्गत प्राप्त २०% सदनिका/गाळे/भुखंडाची ऑनलाईन संगणकीय सोडत ऑगस्ट-२०२६ चे वेळापत्रक

अ.क्र	टप्पा	दिनांक	वेळ
१	सोडतीसाठी जाहिरात प्रसिध्द करणे	२८/०८/२०२६	---
२	ऑनलाईन अर्जासाठी नोंदणीची सुरुवात	२८/०८/२०२६	दुपारी १२.०० वाजेपासून
३	सोडतीसाठी ऑनलाईन अर्ज व पेमेंट स्वीकृती सुरुवात	२८/०८/२०२६	दुपारी १२.०० वाजेपासून
४	ऑनलाईन अर्जासाठी नोंदणीची शेवटची तारीख व वेळ	२८/०९/२०२६	रात्री ११:५९ वाजेपर्यंत
५	सोडतीसाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ	२८/०९/२०२६	रात्री ११:५९ वाजेपर्यंत
६	ऑनलाईन पेमेंट स्विकृती अंतिम दिनांक	२८/०९/२०२६	रात्री ११:५९ वाजेपर्यंत
७	बँकेत RTGS/NEFT द्वारे अनामत रक्कम भरण्याचा अंतिम दिनांक	२८/०९/२०२६	संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत
८	सोडतीसाठी स्विकृत अर्जांच्या प्रारुप यादीची प्रसिध्दी	०५/१०/२०२६	दुपारी ३.०० वाजता
९	प्रारुप यादी प्रसिध्दीनंतर ऑनलाईन आक्षेप/ दावे-हरकती दाखल करण्याचा कालावधी	०५/१०/२०२६	दुपारी ३:०० वाजेपासून
		०७/१०/२०२६	दुपारी ५:०० वाजेपर्यंत
१०	दावे-हरकती निकाली काढल्यानंतर अर्जदारांची अंतिम यादीची प्रसिध्दी	१२/१०/२०२६	दुपारी १२.०० वाजता
११	सोडतीचा दिनांक व वेळ	अर्जदारास स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.	
१२	सोडतीचे स्थळ		
१३	सोडतीमधील यशस्वी व प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांची नावे म्हाडाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ	सोडतीच्या दिवशी दुपारी ४.०० वाजता म्हाडाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.	

२. विविध योजनांची माहिती

अ. क्र.	संकेत क्रमांक	योजनेचे नाव	सदनिकेची अंदाजित किंमत (रु.)	चटई क्षेत्रफळ (चौ.मी.)	बांधकाम क्षेत्रफळ (चौ.मी.)	निवासी भुखंडाचे क्षेत्रफळ(चौमी.)	आरक्षण गटनिहाय उपलब्ध सदनिका															
							अनुसूचित जाती व नवबौद्ध (SC) (एकूण आरक्षण ११ %)	अनुसूचित जमाती (S.T.)	भटक्या जमाती (N.T.)-	विमुक्त जमाती (D.T.)-	पत्रकार	स्वातंत्र्य सैनिक	अंध व शारिरिक दृष्टया अपंग	संरक्षण दल किंवा सिमा सुरक्षा दलातील लढाईत मृत झालेल्याव्यक्तीचे कुटुंबीय अथवा लढाईत जखमी होऊन अपंग झालेले कर्मचारी	माजी सैनिक व त्यांच्यावर अवलंबुन असलेल्या व्यक्ती	महाराष्ट्रातील मतदारसंघाचे प्रतीनिधित्व करणारे संसदेचे विधानसभेचे व विधानपरिषदेचे आजी माली सदस्य	म्हाडा कर्मचारी(ज्यांचा सेवा ५ वर्षे पुर्ण झाली आहे)	राज्य शासकीय कर्मचारी मंडळ महामंडळ इ.चे कर्मचारी (ज्यांचा सेवा ५ वर्षे पुर्ण झाली आहे यात यसपूर्वी सेवानिवृत्त झालेल्यांचा समावेश आहे.)	शासकीय निवासस्थानामध्ये राहणारे आणि जे तीन वर्षात सेवानिवृत्त होणार आहेत विंवा अगोदरच सेचानिवृत्त झालेले आहेत असे केंद्र सरकारचे कर्मचारी	चित्रपट दुरदर्शन नाटक तमाशा आकाशवाणी श माध्यमातील कलाकार तसेच परु र्मिंग आर्टशी संबधित असलेले कलाकार (चित्रकार शिल्पकार गवई वाद्य नतैक कारागिर कवी कव्वाल व नकलाकार)	सर्वसाधारण	महारेरा नोंदणी क्रमांक
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१७	१८	१९	२०	२१	२२	२३
म्हाडा गृहनिर्माण व २०% सर्वसमावेशक गृहनिर्माण योजना																						
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१७	१८	१९	२०	२१	२२	२३
१	२६७	२६ सदनिका अल्प उत्पन्न गट,पंचशील डेव्हलपर्स(ब्रम्हा पार्क),सातारा, छत्रपती संभाजीनगर (२०% योजना)	१३८६६८९-१५०१६८७	४३.४१ - ४७.०१	४७.७५१-५१.७११	०.००	३	२	०	०	१	१	१	१	१	१	१	१	१	१	११	P५१५००००७८७९२
२	२६८	२० सदनिका अल्प उत्पन्न गट, परम डेव्हलपर्स(परम सुवर्ण वास्तु),ईटखेडा, छत्रपती संभाजीनगर	१३३०१४८	४०.२०	४४.२२	०.००	२	१	०	०	०	०	१	०	१	०	०	१	०	०	१४	P५१५००००५२१२६

		(२०% योजना)																			
३	२६९	७३ भुखंड, मध्यम उत्पन्न गट,मुर्तिजापुर, छत्रपती संभाजीनगर (म्हाडा योजना)	३११२५००-६५३६२५०	०.००	०.००	७५-१५७.५०	८	४	१	१	२	२	२	१	४	१	१	४	१	१	४०	NA
४	२७०	१/७२ गाळे (बैठे घर),उच्च उत्पन्न गट,एन-७,सिडको, छत्रपती संभाजीनगर (म्हाडा योजना)	१२०२००००	०.००	७३.९०	१३१.२५	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	१	NA
५	२७१	२८ सदनिका अल्प उत्पन्न गट, मे.नभराज त्रिलोक हाईटस्,शहानुरवाडी, छत्रपती संभाजीनगर (२०% योजना)	१४६१४३८	४२.४८	४६.२७८	०.००	३	२	०	०	१	१	१	१	१	१	१	१	१	१	१३	NA
६	२७२	१० सदनिका अत्यल्प उत्पन्न गट, तुळजाई पार्क,नक्षत्रवाडी, छत्रपती संभाजीनगर (२०% योजना)	१०८१५३०-११४६००९	२९.३५-२९.८२	३२.२९-३२.८०	०.००	१	१	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	८	PR१०४०००२५०२७२६
७	२७३	१३ सदनिका अल्प उत्पन्न गट, तुळजाई पार्क,नक्षत्रवाडी, छत्रपती संभाजीनगर (२०% योजना)	१७०७२६१-१७९८१०३	४५.५०-४७.९४	५०.०५-५२.७३	०.००	१	१	०	०	०	०	०	०	१	०	०	१	०	०	९	PR१०४०००२५०२७१७
८	२७४	३२ भुखंड, अत्यल्प उत्पन्न गट, निलंगा,लातुर (म्हाडा योजना)	२३३०००	०.००	०.००	६०.००	४	२	०	०	१	१	१	१	२	१	१	२	१	१	१४	NA
९	२७५	१/३३६ गाळे (बैठे घर),अल्प उत्पन्न गट, मुकुंदवाडी, छत्रपती संभाजीनगर (म्हाडा योजना)	२९०००००	०.००	२२.९३	४०.००	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	१	NA

Scheme Code	Scheme Name	TOTAL TENAMENTS / PLOTS	Income Group Code	EMD Amount	Display Order	Scheme Address	Taluka	District	Latitude	Longitude	City Survey No	Standard Plot Area	Plot Area Unit	Built up Area	Built up Area Unit	Carpet Area	Carpet Area Unit	Cost	Is PMAY	RERA No
267	Panchshil Devlepers (Bramha Park), Gut no 219/Part, Satara, Chhatrapati Sambhajinagar (20% Scheme)	26	LIG	10000	1	Gut no 219/Part, Satara, Chhatrapati Sambhajinagar	Chhatrapati Sambhajinagar	Chhatrapati Sambhajinagar	19.829645	75.345564	Gut No 219/Part	0	Sq. Mtr	47.751-51.711	Sq. Mtr	43.41-47.01	Sq. Mtr	1386689-1501687	No	P51500078792
268	Param Devlepers (Param Suvarn Vastu), Gut no 01/Part, Itkheda, Chhatrapati Sambhajinagar (20% Scheme)	20	LIG	10000	2	Gut no 01/Part, Itkheda, Chhatrapati Sambhajinagar	Chhatrapati Sambhajinagar	Chhatrapati Sambhajinagar	19.847002	75.300618	Gut No 01/Part	0	Sq. Mtr	44.22	Sq. Mtr	40.20	Sq. Mtr	1330148	NO	P51500052126
269	73 PLOTS MIG, GUT NO 34/2 & 35/2, MURTIJAPUR, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR	73	MIG	15000	3	GUT NO 34/2 & 35/2, MURTIJAPUR, CHHATRAPATI SAMBHAJI NAGAR	Chhatrapati Sambhajinagar	Chhatrapati Sambhajinagar	19.866154	75.390025	GUT NO 34/2 & 35/2	75-157.50	Sq. Mtr.	0	Sq. Mtr	0	Sq. Mtr	3112500-6536250	NO	NO
270	72 T/s HIG,N-7,R-28,CIDCO,CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (Row House)	1	HIG	20000	4	PLOT NO.R-28,N-7,CIDCO	Chhatrapati Sambhajinagar	Chhatrapati Sambhajinagar	19.897085	75.360883	PLOT NO.R-28	131.25	Sq. Mtr.	73.9	Sq. Mtr	0	Sq. Mtr	12020000	NO	NO
271	M/s Nabhraj Trilok Hights, Gut no 26 (Part), shahanurwadi, Chh. Sambhajinagar (20% Scheme)	28	LIG	10000	5	Gut no 26 (Part), shahanurwadi, Chh. Sambhajinagar	Chhatrapati Sambhajinagar	Chhatrapati Sambhajinagar	19.85251	75.335277	Gut no 26 (Part)	0	Sq. Mtr.	46.728	Sq. Mtr	42.48	Sq. Mtr	1461438	NO	NO
272	Tuljai Park, Gut No 49 (Part) Nakshtrawadi, Chh. Sambhajinagar (20% Scheme)	10	EWS	5000	7	Gut No 49 (Part) Nakshtrawadi, Chh. Sambhajinagar	Chhatrapati Sambhajinagar	Chhatrapati Sambhajinagar	19.807196	75.281058	Gut No 49 (Part)	0	Sq. Mtr.	32.29-32.80	Sq. Mtr	29.35-29.82	Sq. Mtr	1081530-1146009	NO	PR1040002502716

273	Tuljai Park, Gut No 49 (Part) Nakshtrawadi, Chh. Sambhajinagar (20% Scheme)	13	LIG	10000	8	Gut No 49 (Part) Nakshtrawadi, Chh. Sambhajinagar	Chhatrapati Sambhajinagar	Chhatrapati Sambhajinagar	19.807196	75.281058	Gut No 49 (Part)	0	Sq. Mtr.	50.05-52.73	Sq. Mtr	45.50-47.94	Sq. Mtr	1707261-1798103	NO	PR1040002502717
274	32 PLOTS EWS, SR NO 268/B/2 NILANGA, LATUR	32	EWS	5000	9	SR NO 268/B/2, NILANGA, LATUR	Nilanga	Latur	18.125563	76.748223	SR NO 268/B/2	60	Sq. Mtr.	0	Sq. Mtr	0	Sq. Mtr	233000	NO	NO
275	336 T/s LIG,S.NO.7/1 and 7/2,MUKUNDWADI, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (Row House)	1	LIG	10000	10	SURVE NO.7/1 AND 7/2,MUKUNDWADI CHHATRAPATI SAMBHAJI NAGAR	Chhatrapati Sambhajinagar	Chhatrapati Sambhajinagar	19.868393	75.387828	S.NO.7/1 AND 7/2	40	Sq. Mtr.	22.93	Sq. Mtr	0	Sq. Mtr	2900000	NO	NO

३. पात्रतेच्या अटी

ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी अर्जदारांनी माहिती पुस्तिका काळजीपुर्वक वाचावी.

निवासी सदनिका/भुखंड विक्रीसाठी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१ व महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापक, गाळयांची विक्री, हस्तांतरण व अदलाबदल) विनियम १९८१ या मधील तरतुदीनुसार व त्या वेळी, लागू केल्या जाणाऱ्या तरतुदींच्या अधीन राहून इच्छुक अर्जदारांकडून या सदनिका विक्रीकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

३.१ अर्ज सादर करावयाच्या दिवशी अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे.

३.२ अर्जदार किंवा त्यांची पत्नी/पती किंवा त्यांची अज्ञान मुले यांच्या नावे मालकी तत्वावर, भाडे खरेदी पध्दतीवर अथवा नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेचा सदस्य म्हणून ज्या योजनांसाठी जाहिरात प्रसिध्द केलेली आहे त्या योजनेच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या (नगरपालिका/ महानगरपालिका, ग्रामपंचायत इत्यादीच्या) हद्दीत म्हाडाने वितरीत केलेला, शासनाने वितरीत केलेला किंवा खाजगीरित्या संपादित केलेला निवासी गाळा/ निवास भुखंड नसावा. या संबंधीची म्हाडा विनियमातील तरतूद खालीलप्रमाणे आहे.

Maharashtra Housing and area development(Estate Manager,sale,transfer and exchange of tenements) Regulations १९८१- 9(A)- A person shall not be eligible to apply for any tenement in municipal area if he or his/her spouse or/ his minor children own a house or a flat or a residential plot of land or holds on a hire- purchase basis or outright sale basis or on a rental basis from the Maharashtra Housing and Area Development Authority a house or a flat or a residential plot of land in his/ her name or in the name of his/ her minor children as the case may be, in such a municipal area.

गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. याचिका-२०१९/ प्र.क्र.६६/गृनिप दिनांक: ११ सप्टेंबर,२०१९ अन्वये शासकीय गृहनिर्माण योजनेतील घर धारण करीत असलेल्या व्यक्तीस त्या किंवा अन्य कोणत्याही शासकीय गृहनिर्माण योजनेत दुसरे घर अनुज्ञेय नाही याबाबत तरतूद करण्यात आली आहे.

"राज्यातील एखादी व्यक्ती किंवा तिचे कुटुंबातील कोणत्याही व्यक्ती, राज्यातील कोणत्याही भागात महाराष्ट्र शासनाच्या किंवा शासन अधिनस्त कोणत्याही प्राधिकरण/ स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कोणत्याही शासकीय गृहनिर्माण योजनेत त्याला मालकी तत्वावर वाटप झालेले/वितरित झालेले घर/ सदनिका धारण करत असेल अथवा केंद्र शासन/ राज्य शासनाकडुन अनुदान प्राप्त गृहनिर्माण / आवास योजनेचा लाभ घेतला असेल तर यापुढे, अशा व्यक्ती किंवा त्याच्या /तिच्या कुटुंबियांना राज्यामध्ये कोठेही राज्य शासनाच्या /शासन अधिनस्त प्राधिकरण/ स्थानिक स्वराज्य संस्थेकडे, त्या किंवा अन्य कोणत्याही गृहनिर्माण योजनेत शासकीय योजनेतील दुसरे घर/ सदनिका/ भुखंड अनुज्ञेय नाही."

३.३ अर्जदाराचे जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून मागील सलग २० वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागामध्ये अर्जदाराचे किमान १५ वर्षे सलग वास्तव्य असल्याबाबतचे सक्षम प्राधिकरण यांनी दिलेले महाराष्ट्रातील अधिवासाचे प्रमाणपत्र (Domicile Certificate) संगणकीय प्रणालीद्वारे ग्राह्य धरले जाईल/ Capture केले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी. केंद्रशासन कर्मचारी (CG) प्रवर्गाकरिता सदर अट शिथील राहील. इतर कोणताही पुरावा अधिवास प्रमाणपत्र म्हणून संगणकीय प्रणालीव्दारे ग्राह्य धरले जाणार नाही/Capture केली जाणार नाही, याची कृपया संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज करतांना विशेष नोंद घ्यावी. **अधिवास प्रमाणपत्र हे १ जानेवारी २०१८ नंतर दिलेले असावे व त्यावर बारकोड असणे आवश्यक आहे.**

(Domicile Certificate must be issued after 1st January 2018 and must have the barcode which is issued by Mahaonline/ MahaIT. If you don't have the Domicile Certificate you can apply for new Domicile on Aaplesarkar and provide the application ID/ Number of your Domicile Application and you will be allowed to proceed subject to condition that you will provide and upload the Domicile certificate before talking possession of the flat. You can also get the Domicile Certificate by visiting the nearest maha e-seva Kendra. To apply for new Domicile)

३.४ दिनांक ०१.०४.२०२५ ते ३१.०३.२०२६ या आर्थिक वर्षाच्या कालावधीतील अर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न विविध उत्पन्न गटासाठी खाली दर्शविल्याप्रमाणे असावे.

"कौटुंबिक वार्षिक उत्पन्न" म्हणजे अर्जदाराचे स्वत:चे व त्यांची पत्नी/ पती यांचे दोघांचे मिळून वार्षिक नोकरीद्वारे अथवा उद्योगधंद्यापासून, जीवितार्थाचे सर्वसाधारण साधन म्हणून उत्पन्न."

दि.०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ या कालावधीत झालेल्या उत्पन्नाच्या प्राप्तीवरुन आयकर विवरण पत्र अथवा तहसिलदार यांनी प्रदान केलेला उत्पन्नाचा दाखला उत्पन्न पुरावा म्हणून सादर करणे आवश्यक आहे. या व्यतिरीक्त अन्य कोणत्याही स्वरुपाचा उत्पन्न स्त्रोताबाबतची कागदपत्रे/ दाखले/ पुरावे/ प्रतिज्ञापत्र/ वेतन प्रमाणपत्र इ.संगणकीय प्रणालीद्वारे ग्राह्य धरली जाणार नाही/ Capture केली जाणार नाही, याची विशेष नोंद घ्यावी.

उत्पन्न मर्यादा खालीलप्रमाणे

अर्जदाराची गटनिहाय वार्षिक कौटुंबिक कमाल मर्यादा (रुपये वार्षिक) खालीलप्रमाणे राहील. (महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग यांच्या शासन निर्णय क्र.प्रआयो-२०१९/प्र.क्र.१२६/गृनिधो-२ दि.१६ मार्च २०२३ रोजीच्या सुधारीत परिपत्रकानुसार)

अ क्र	उत्पन्न गट	सुधारित कमाल उत्पन्न मर्यादा (रुपये वार्षिक)	
		मुंबई महानगर क्षेत्र MMR, पुणे महानगर क्षेत्र PMRDA, नागपूर महानगर क्षेत्र NMRDA, नागपूर सुधार प्रन्यास NIT प्रदेश तसेच १० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत क्षेत्र.(संकेत क्र.२६७ ते २७४ व संकेत क्र.२७६)	उर्वरित महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत क्षेत्र (संकेत क्र.२७५)
१	अत्यल्प उत्पन्न गट (EWS)	रुपये ६,००,०००/- पर्यंत	रुपये ४,५०,०००/- पर्यंत
२	अल्प उत्पन्न गट (LIG)	रुपये ९,००,०००/- पर्यंत	रुपये ७,५०,०००/- पर्यंत
३	मध्यम उत्पन्न गट (MIG)	रुपये १२,००,०००/- पर्यंत	
४	उच्च उत्पन्न गट (HIG)	कमाल मर्यादा नाही. (रु.१२,००,०००/- पेक्षा जास्त)	

टिप :- उपरोक्त ४ ही उत्पन्न गटासाठी किमान मर्यादा निश्चित करण्यात आली नसली तरी ,

१. अत्यल्प उत्पन्न गटातील व्यक्ती अत्यल्प व अल्प उत्पन्न गटासाठी अर्ज करु शकतात.
२. अल्प उत्पन्न गटातील व्यक्ती अल्प व मध्यम उत्पन्न गटासाठी अर्ज करु शकतात.
३. मध्यम उत्पन्न गटतील व्यक्ती मध्यम व उच्च उत्पन्न गटासाठी अर्ज करु शकतात.
४. उच्च उत्पन्न गटातील व्यक्ती फक्त उच्च उत्पन्न गटासाठी अर्ज करु शकतात.

४. संगणकीकृत अर्ज करण्याची कार्यपध्दती

४.१ म्हाडा लॉटरी संकेतस्थळ **housing.mhada.gov.in** येथे अथवा **Mobile App- Mhada Housing Lottery System** वर अर्जदाराने सर्व प्रथम स्वत:ची नाव नोंदणी करावी व सर्व माहिती काळजीपूर्वक भरावी.

४.२ नाव नोंदणीसाठी अर्जदाराने, आवश्यक ती सर्व माहिती भरणे आवश्यक आहे. तसेच * अशी खुण असलेली माहिती भरणे बंधनकारक आहे. अशी बंधनकारक माहिती व ड्रॉप डाऊन मधील माहिती फक्त इंग्रजीमध्ये उपलब्ध राहील.

४.३ **अर्जदाराने ऑनलाईन अर्ज करणेपूर्वी खालील माहिती सोबत ठेवावी, म्हणजे अर्ज भरणे सुलभ होईल.**

१. अर्जदाराचे स्वत:चे आधार व पॅन कार्ड.

२. अर्जदार विवाहीत असल्यास पती/पत्नी दोघांचे आधार व पॅन कार्ड.

३. अर्जदार सध्या वास्तव्यास असलेल्या घराचा संपूर्ण पत्ता व पोस्टाचा पिन कोड क्रमांक सुस्पष्टपणे नोंदणी करुन खात्री करणे आवश्यक आहे. जेणे करुन मंडळाद्वारे होणारा पत्रव्यवहार हा अर्जदारास योग्य पत्त्यावर प्राप्त होईल.

४. अर्जदाराचा आधारकार्डशी संलग्न (Linked) स्वत:चा भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile No) व ई-मेल आय.डी. नोंदणी करुन खात्री करणे आवश्यक आहे. तसेच आधारकार्ड व पॅनकार्ड ऑनलाईन पडताळणी होणार असल्याने अर्जदाराचे स्वत:चे Digilocker खाते असणे आवश्यक आहे. नसल्यास Digilocker खाते बनविणे बंधनकारक आहे.

५. अर्जदाराचे बार कोड असलेले महाराष्ट्रातील वास्तव्याचे अधिवास प्रमाणपत्र आवश्यक (Domicile Certificate) (सन-२०१८ नंतरचे)

६. उत्पन्नाच्या स्त्रोताकरिता पात्र उत्पन्न गटानुसार अर्जदाराचे दिनांक ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ (Assesment Year-२०२६-२०२७) मधील आयकर विवरण पत्र अथवा दिनांक ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ तहसिलदार यांनी प्रदान केलेला उत्पन्नाचा दाखला.

७. आरक्षण प्रवर्गाकरिता जात पडताळणी प्रमाणपत्र, ते उपलब्ध नसल्यास जातीचा दाखला अर्जदारास सोडतीत यशस्वी झाल्यानंतर देकारपत्रात नमुद विहित कालावधीमध्ये जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

८. इतर आरक्षित गटासाठी निश्चित करुन देण्यात आलेले विहीत नमून्यातील सक्षम प्राधिकाऱ्याने साक्षांकित केलेले प्रमाणपत्र.

९. अर्जदाराच्या बँक खात्याच्या तपशिलामध्ये बँकेचे नाव, बँकेची शाखा, खाते क्रमांक, आयएफएससी कोड, एमआयसीआर क्रमांक योग्य असल्याची व सदर बँक खाते बंद नसल्याची खात्री करणे आवश्यक आहे, जेणेकरुन अनामत रक्कम भरणा व परतावा करणे सोयीचे होईल. चुकीचे बँक तपशिल दिल्यावर अनामत रक्कम परताव्यामध्ये अडचणी उद्‌भवल्यास म्हाडा जबाबदार राहणार नाही (चुकीचे बँकेचे तपशिल दिल्यावर अयशस्वी अर्जदाराचे अनामत रक्कम परतावा मध्ये विलंब होऊ शकतो). अर्जदारास दुसऱ्या व्यक्तीच्या बँक खात्याचा तपशिल देऊन अर्ज करता येणार नाही तसेच चालु खाते, संयुक्त खाते, एन.आर.आय. खात्याचा तपशिल चालणार नाही, असे केल्यास संगणकीय प्रणालीद्वारे अर्ज ग्राह्य धरला जाणार नाही. याची अर्जदाराने विशेष दक्षता व नोंद घ्यावी. अर्जदारांच्या बँकेच्या शाखेचा MICR/IFSC क्रमांक टाईप केल्यानंतर सदर बँक व शाखेचे नाव आपोआप प्रदर्शित होत नसेल तर अर्जदाराने अन्य बँक खात्याची माहिती द्यावी अथवा स्वत:च्या बँकेशी संपर्क साधावा.

४.४ ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर अर्जदाराला पात्रतेनुसार वेगवेगळ्या संकेत क्रमांकासाठी अथवा एकाच संकेतातील वेगवेगळ्या प्रवर्गात एका पेक्षा जास्त अर्ज करता येतील.

४.५ अर्जदाराने एकदा नोंदणी केल्यानंतर User Name व पासवर्ड OTP चा वापर करुन सदर अकाऊंट Operate करता येईल. सर्व Communication हे e-mail, SMS व संकेत स्थळावर तयार करण्यात आलेल्या खात्यावर / Login वर करण्यात येणार असल्यामुळे e-mail व Mobile No. भरतांना काळजी घेणे तसेच सदर e-mail व SMS सोडत प्रक्रियेदरम्यान तोच ठेवणे आवश्यक आहे.

४.६ **ऑनलाईन अर्ज करणे : ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत दि.२८/०८/२०२६ दुपारी १२.०० वा. पासून ते दि.२८/०९/२०२६ रात्री ११:५९ वा पर्यंत राहील या कालावधी व्यतिरिक्त कोणी अर्ज केला असेल तर असा अर्ज सोडत प्रक्रियेमध्ये ग्राहय धरला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. अर्ज करतांना अर्जदार ज्या उत्पन्न गटाकरिता/ प्रवर्गाकरिता पात्र असेल त्या उत्पन्न गटाकरिता असलेल्या संकेताकरिता व प्रवर्गाकरिता अर्ज करु शकता.**

अनामत रक्कमेचा भरणा केल्यानंतर अर्ज फक्त पाहता येऊ शकेल. अर्जदाराने त्याचा ऑनलाईन अर्ज ओपन करुन त्यामध्ये कोणताही फेरफार करणे शक्य होणार नाही, याची नोंद घ्यावी. अर्जदाराने प्रिंटेड रिसिप्ट मधील माहिती वाचून बरोबर असल्याची खात्री करावी.

प्रत्येक अर्जासाठी खालीलप्रमाणे अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे.

अ.क्र	उत्पन्न गट	अनामत रक्कम	अर्जासोबत भरावयाची अनामत रक्कम व अर्ज शुल्क रु.६००/- + (जीएसटी @ १८%) रु.१०८/- = एकूण रु.७०८/- (विना परतावा)
१.	अत्यल्प उत्पन्न गट (Economical Weaker Section) संकेत क्र.२७३ व २७५	रु.५,०००/-	रु.५,७०८/-
२.	अल्प उत्पन्न गट (Lower Income Group) संकेत क्र.२६७,२६८,२७१,२७२,२७४,२७६	रु.१०,०००/-	रु.१०,७०८/-
३.	मध्यम उत्पन्न गट (Middle Income Group) संकेत क्र.२६९	रु.१५,०००/-	रु.१५,७०८/-
४.	उच्च उत्पन्न गट (Higher Income Group) संकेत क्र.२७०	रु.२०,०००/-	रु.२०,७०८/-

४.७ अनामत रक्कमेच्या अदायगीसाठी Payment विवरणामध्ये योग्य पर्यायाची निवड करुन अनामत रक्कम व अर्ज फी भरण्याबाबतची प्रक्रीया पुर्ण करावी. (विहित रक्कमेचे Payment करण्यासाठीच्या पध्दतीची सविस्तर माहिती Help File मध्ये देण्यात आली आहे.) ऑनलाईन पेमेंट स्विकृती अंतिम तारीख दि.२८/०९/२०२६ रात्री ११:५९ वा पर्यंत राहिल. NEFT/RTGS द्वारे अर्जासोबत दि.२८/०९/२०२६ रोजी संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत राहिल. सदर रक्कम दि.२८/०९/२०२६ पर्यंत म्हाडाच्या खात्यावर जमा होणे आवश्यक आहे.

४.८ जे अर्जदार ऑनलाईन पध्दतीने पेमेंट करणार आहेत ते अर्जदार Net banking, Credit Card, Debit Card द्वारे Online Payment करु शकतात. अनामत रक्कम + विनापरतावा अर्ज शुल्क रु.७०८/- (रु.६००/- + १८% GST रु.१०८/-) RTGS/NEFT द्वारे भरणा करायची असल्यास चलनाद्वारे अनामत रक्कम + अर्ज शुल्क भरावी लागेल RTGS/NEFT चा पर्याय स्विकारल्यावर चलन प्राप्त होईल. प्राप्त चलन

दि.२८/०९/२०२६ पर्यंत संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत जमा करता येईल. चलन वर नमुद खाते क्रमांक मध्ये रक्कम जमा झाल्यास अर्जदारास SMS द्वारे कळविण्यात येईल. ज्या अर्जदाराची यशस्वीरीत्या अनामत रक्कम भरणा होईल व ज्यांचे अर्ज पुर्णपणे भरलेले असतील ते सोडतीसाठी पात्र ठरतील.

४.९ अर्जदारास सोडतीपूर्वी अनामत रक्कम भरुन केलेला अर्ज कोणत्याही कारणास्तव मागे घेता येणार नाही व सोडतीपूर्वी अनामत रक्कम परत मिळणार नाही. अर्जदाराने **Credit Card द्वारे अनामत रक्कम भरल्यावर सदर रक्कम कोणत्याही कारणास्तव म्हाडाच्या खात्यामध्ये पोहोचली नाही किंवा पोहोचण्यापूर्वी कोणत्याही कारणास्तव अर्जदाराच्या खात्यात परत वर्ग झाली किंवा परत घेतली (Charge Back) तर अशा अर्जदाराचा अर्ज सोडतीकरीता ग्राह्य धरला जाणार नाही.**

४.१० अर्जदार त्याच्या उत्पन्न गटानुसार पात्र असलेल्या योजना संकेतासाठी अर्ज करु शकतो. तथापी एकापेक्षा जास्त पात्र योजना संकेतासाठी अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक संकेत क्रमांकासाठी स्वतंत्र अनामत रक्कमेसह वेगळा अर्ज करावा लागेल. जर अर्जदार त्याची पती/ पत्नी एकापेक्षा जास्त योजना संकेत क्रमांकामध्ये सोडतीचा निकाल जाहिर झाल्यानंतर अशा अर्जदारांना कार्यालयीन कामकाजाच्या १५ दिवसाच्या आत कोणत्याही एकाच योजना संकेतासाठी आपली पसंती Online सादर करणे बंधनकारक आहे. या कालावधीमध्ये अर्जदाराकडून Online पसंती प्राप्त न झाल्यास अर्जदार सदनिका घेण्यास इच्छुक नाही, असे गृहीत धरुन अर्जदाराचे सदनिका वितरण रद्द समजण्यात येऊन प्रतिक्षायादी वरील अर्जदाराला संधी देण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

४.११ सोडतीमधील यशस्वी अर्जदारांना सोडतीनंतर १५ दिवसांच्या आत Online स्विकृती पत्र सादर करणे बंधनकारक असेल. विहीत मुदतीमध्ये स्विकृती पत्र प्राप्त न झाल्यास अर्जदार सदनिका घेण्यास इच्छुक नाही, असे गृहीत धरुन अर्जदाराची सदनिका वितरण रद्द समजण्यात येऊन संगणक प्रणालीद्वारे आपोआप (by default) प्रतिक्षा यादीवरील अर्जदाराला संधी देण्यात येईल. यापश्चात अर्जदाराने केलेल्या कोणत्याही विनंतीची/ तक्रारी अर्जाची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

४.१२ अर्जदार योजना संकेतामधील ज्या प्रवर्गामध्ये अर्ज करण्यास पात्र आहे अशा सर्व प्रवर्गातील सदनिकांकरिता अर्ज करु शकतो. प्रत्येक योजनेतील व पात्र प्रवर्गातील सदनिकांकरिता स्वतंत्र अर्ज करावे लागतील व प्रत्येक अर्जासोबत स्वतंत्र अनामत व अर्जाची रक्कम भरावी लागेल. **मात्र एका योजना संकेतामधील एका प्रवर्गात एकापेक्षा अधिक अर्ज करता येणार नाही.** एकाच संकेतामध्ये व एकाच प्रवर्गात एकापेक्षा अधिक अर्ज केल्याचे आढळल्यास त्या अर्जदाराचे त्या प्रवर्गातील असे सर्व अर्ज कोणतेही कारण न देता रद्द करण्यात येतील.

वरील अटी व्यतिरिक्त सदर योजनेतील सदनिकांसाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापक, गाळयांची विक्री, हस्तांतरण व सदनिकांची अदलाबदल) विनियम-१९८१ च्या अटी व शर्ती जशाच्या तशा व संपूर्णपणे (वेळोवेळी होणाऱ्या सुधारणासह) लागू राहतील.

५. संगणकीकृत सोडतीची कार्यप्रणाली

५.१ जाहिरातीनुसार प्राप्त झालेल्या सर्व ऑनलाईन अर्जाची सोडतीकरिता पात्रता निश्चिती ही MHADA IHLMS २.० या नवीन संगणकीय प्रणाली अंतर्गत करण्यात येईल. अर्ज विहित अनामत रक्कमेसह पूर्णपणे भरले आहेत की नाही हे तपासण्यात येईल. अपूर्ण आढळलेले अर्ज सोडतीपूर्वी रद्द केले जातील व त्याबाबत अर्जदाराकडून केलेल्या कोणत्याही निवेदनाचा विचार केला जाणार नाही. खालील प्रकारचे अर्ज आढळल्यास असे सर्व अर्ज सोडतीमधुन संगणकीय प्रणालीद्वारे आपोआप बाद ठरविले जातील अथवा वितरण प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द होण्यास पात्र असतील.

१. एकाच अर्जदाराचे एकाच संकेतामध्ये, एकाच प्रवर्गात एकापेक्षा जास्त अर्ज.

२. अर्जासोबत आवश्यक प्रमाणपत्र आणि दस्तऐवज दाखल न केल्यास अथवा चुकिचे दाखले सादर केलेले अर्ज.

३. वेगवेगळ्या अर्जदारांचे एकाच बँकेमध्ये एकच खाते क्रमांक.

४. विहित मुदतीमध्ये अनामत रक्कम बँकेत जमा झाले नाहीत असे अर्ज .

५. ऑनलाईन अर्ज चालु होण्यापूर्वी व मुदत संपल्यानंतर केलेले अर्ज. ऑनलाईन अर्ज चालु होण्याची व बंद होण्याची वेळ ही SERVER मध्ये असलेली वेळ ग्राह्य धरण्यात येईल.

६. पात्रतेच्या अटी व शर्ती चे अनुपालन न केलेले अर्जदार.

५.२ सोडतीसाठी पात्र असलेल्या अर्जदारांचे अर्ज क्रमांकांची आरक्षण निहाय प्रारुप यादी म्हाडाच्या **housing.mhada.gov.in** व **mhada.gov.in** ह्या अधिकृत संकेत स्थळावर व **Mobile App- Mhada Housing Lottery System** दि.०५/१०/२०२६ रोजी दुपारी ३:०० वाजता प्रसिध्द करण्यात येईल. त्याबाबत अर्जदारांच्या तक्रारी असतील तर अशा अर्जदारांनी संकेतस्थळावर प्रारुप यादी प्रसिध्द झाल्यानंतर दि.०५/१०/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपासून ते दि.०७/१०/२०२६ रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यंत संकेतस्थळावर हरकती/ दावे/ निवेदन सादर करणे आवश्यक आहे. याबाबतची माहीती म्हाडाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तथापी अर्जदाराने दिलेल्या माहितीमध्ये बदल केला जाणार नाही. सोडतीनंतर कोणत्याही तक्रारींचा विचार केला जाणार नाही. अशा प्रकारे आलेल्या हरकतींची छाननी करुन सोडतीसाठी पात्र असलेल्या अर्जदारांची अंतिम यादी दि.१२/१०/२०२६ रोजी दुपारी १२:०० वाजता वरील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

MHADA IHLMS २.० या संगणकीय प्रणालीद्वारे सोडतीसाठी पात्र ठरलेल्या अर्जदारांना संगणकीय सोडतीचा दिनांक,वेळ व स्थळ नंतर स्वतंत्ररित्या ऑनलाईन पद्धतीने कळविण्यात येईल. सोडतीचे वेळापत्रक म्हाडाचे अधिकृत संकेत स्थळ **housing.mhada.gov.in** व **mhada.gov.in** ह्या अधिकृत संकेतस्थळावर व **Mobile App- Mhada Housing Lottery System** वर प्रसिध्द करण्यात येईल. सोडतीच्या दिनांकाबाबत अर्जदारांना वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

५.३ सोडतीत यशस्वी झालेल्या तसेच प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांचे अर्जांचे क्रमांक म्हाडाच्या **housing.mhada.gov.in** व **mhada.gov.in** ह्या अधिकृत संकेत स्थळावर व **Mobile App- Mhada Housing Lottery System** वर प्रसिध्द करण्यात येतील संगणकीय सोडतीत यशस्वी झालेल्या अर्जदारांना तात्पुरते देकारपत्र Login ID वर Online उपलब्ध होईल तसेच SMS link/E-mail id link प्राप्त होईल.

५.४ एखाद्या संकेताकरीता अथवा त्यामधील प्रवर्गाकरीता प्रत्यक्ष मागणीपेक्षा प्रतिसाद कमी आल्यास, व त्यामुळे सदनिका रिक्त राहण्याच्या स्थितीत **महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम-१९७६ च्या अंतर्गत (जमीनीची विल्हेवाट) नियम १९८१ मधील विनियम १३ अंतर्गत** MHADA IHLMS २.० या संगणकीय प्रणालीद्वारे कार्यवाही केली जाईल.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम-१९७६ च्या अंतर्गत (जमीनीची विल्हेवाट) नियम १९८१ चे नियम १३ मधील तरतूद खालीलप्रमाणे आहे.

(a) If sufficient number of applications are not received from the persons belonging to any of the categories (1)-SC, (1-a) - ST, (1-b) - NT, and (1-c)-DT the application from persons belonging to any of the other said four categories shall be considered for the reservation.

(b) If sufficient number of applications are not received from the persons belonging to category (5) - DF, the applications from persons belonging to category (6)- EX shall be considered for the said reservation.

(c) If sufficient number of applications are not received from the persons belonging to any of the reserved categories, other then those mentioned in clause (a) above, tenements or plots reserved for such categories remaining unallotted may be released for allotment to persons belonging to the general category. The tenements or plots reserved for categories (1)-SC, (1-a)-ST, (1-b)-NT and (1-c)-DT shall not however, be released for allotment for allotment to persons belonging to the general category (GP) subject to the provision of clause (a) above to persons belonging to any other reserved category, without the approval of government.

- म्हाडा (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१ मधील विनियम १३ (अ) अन्वये अनुसूचित जाती आणि नवबौध्द (SC), अनुसुचित जमाती (ST), भटक्या जमाती (NT), विमुक्त जाती (DT), या पैकी कोणत्याही प्रवर्गाकरीता उपलब्ध सदनिकांच्या संख्येएवढे अर्ज प्राप्त न झाल्यास प्रवर्गनिहाय रिक्त राहणाऱ्या सदनिकांसाठी वरील ४ प्रवर्गातील अर्जदारांचे अर्ज या आरक्षणाखाली विचारात घेतले जातील.
- म्हाडा (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१ मधील विनियम १३ (ब) अन्वये संरक्षण दलातील किंवा सीमा सुरक्षा दलातील जे कर्मचारी लढाईत जखमी होऊन अपंग झालेले आहेत (DF) या प्रवर्गात उपलब्ध सदनिकांपेक्षा कमी अर्ज प्राप्त झाल्यास सदर सदनिकांचे आरक्षण माजी सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती (EX) या प्रवर्गातून भरणेत येईल.

५.५ MHADA IHLMS २.० या संगणकीय प्रणालीद्वारे पात्र ठरलेल्या अर्जातून स्वतंत्रपणे संकेत क्रमांक निहाय व आरक्षण प्रवर्ग क्रमांक निहाय जाहीर सोडत संगणकाद्वारे काढण्यात येईल. संकेत क्रमांक निहाय व प्रवर्गनिहाय अर्जांची संख्या जास्त असल्यास प्रत्येक योजना संकेत क्रमांक प्रवर्गाकरिता उपलब्ध सदनिकांच्या संख्येएवढी यशस्वी यादीसाठी सोडत काढण्यात येईल. त्याच बरोबर प्रत्येक संकेतासाठी व त्यातील प्रवर्गासाठी १:१ या प्रमाणात प्रतिक्षायादी काढण्यात येईल अथवा त्यामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार मा.मुख्य अधिकारी/ छत्रपती संभाजीनगर मंडळ यांना असतील. सदर प्रतिक्षा यादी १ वर्षाकरिता वैध राहिल.

यशस्वी लाभार्थींच्या यादीतील अर्जदारांची पात्रता निश्चित करण्याकरीता अर्जदारांना अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या पृष्ठ्यर्थ संगणकीय प्रणालीमध्ये सादर केलेली माहिती Capture करुन पात्रता निश्चिती केली

जाईल. **पात्रतेसाठी कागदपत्रांमध्ये जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity certificate), स्वातंत्र्य सैनिक प्रमाणपत्र (FF), लोकसभा/विभानसभा/विधानपरिषदेचे विद्यमान/माजी सदस्य (MP/ MLA/ MLC) तसेच कलाकार (AR) प्रमाणपत्र मिळण्यास उशिर लागतो असा अनुभव आहे. त्यामुळे अर्जदारांनी या प्रमाणपत्रासाठी आधीच योग्य त्या प्राधिकाऱ्यांकडे अर्ज करुन सदर प्रमाणपत्र संगणकीय प्रणालीमध्ये Upload करण्यात यावे व तद्नंतर माहिती Capture करुन पात्रता निश्चिती केली जाईल.**

५.६ अर्जदाराची पात्रता सोडतीपुर्वीच संगणकीय प्रणालीद्वारे निश्चित केली जाईल मात्र, सोडतीनंतर अर्जदाराने सादर केलेले दस्तऐवज/ प्रमाणपत्र/ पुरावे इतर माहीती असत्य, खोटी, बनावट आढळून आल्यास अर्जदाराचे सदनिका वितरण कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

५.७ अर्जदारास सोडतीमध्ये यशस्वी ठरल्यानंतर ऑनलाईन संगणकीय प्रणालीव्दारे यशस्वी झालेल्या सदनिका/भुखंडासाठी स्विकृती/समर्पण करण्यासाठी १५ दिवसांसाठी लिंक उपलब्ध करुन देण्यात येईल त्यानुसार अर्जदाराने विहित वेळेत आपली स्विकृती न दिल्यास त्याचा अर्ज आपोआप/By Default रद्द होईल व त्याच्या अनामत रक्कमेतून प्रशासकीय शुल्कापोटी रु.१,०००/- वजावट करुन उर्वरित रक्कम विना व्याज त्यांनी दिलेल्या बँक खात्यामध्ये RTGS/NEFT व्दारे अनामत रक्कम परतावा करण्याची कार्यवाही केली जाईल व त्याच्या बदल्यात प्रतिक्षायादी वरील अर्जदाराचा अर्ज संगणकीय प्रणालीव्दारे आपोआप /By Default कार्यान्वित होईल याची कृपया नोंद घ्यावी. त्यामुळे यशस्वी अर्जदाराने स्विकृती पत्र विहित मुदतीत देण्याची दक्षता घ्यावी.

५.८ सोडतीमध्ये अयशस्वी झालेल्या तसेच प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांना त्यांनी अदा केलेली संपूर्ण अनामत रक्कम (विनाव्याज) अर्ज शुल्क वगळून (ऑनलाईन अर्जापोटी अदा केलेले रु.६००/- + जीएसटी @ १८% रु.१०८/-) = रु.७०८/- Electronic Clearing System (E.C.S) NEFT द्वारे अर्जदाराच्या बँक खात्यात अदा करण्यात येईल. यासाठी अर्जदाराने त्याच्या अर्जाच्या अनामत रक्कम परतावाबाबत माहिती भरताना त्याच्या बँकेचे नाव, शाखेचे नाव व पत्ता, बँक खाते क्रमांक व एम.आय.सी.आर. (MICR) क्रमांक अथवा आय.एफ.एस.सी. (IFSC) क्रमांक अचूकपणे नमूद करावा. ज्या अर्जदारांनी Debit/Credit card द्वारे अनामत रक्कम जमा केली आहे, अशा अयशस्वी अर्जदारांची व प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांची अनामत रक्कम सुध्दा त्यांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या बँक खात्यावरच सोडत झाल्यानंतर १५ दिवसात परत करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. चुकीच्या बँक खाते माहितीमुळे अनामत रक्कम परतावा करण्यास उशीर झाल्यास त्यास अर्जदार जबाबदार राहिल.

५.९ अर्जदाराला सोडतीमध्ये अर्ज केल्यापासून माहिती त्यांनी दिलेल्या मोबाईल क्रमांकावर, एसएमएस व ई-मेल द्वारा पाठविण्यात येईल. त्यामुळे अर्जदाराने अचूक मोबाईल क्रमांक व ई-मेल आय.डी. द्यावा. **अर्जदाराने अर्ज करतांना दिलेला मोबाईल क्रमांक व ई-मेल बदलु नये.**

५.१० सदरच्या कालावधीत मोबाईल मध्ये Do Not Disturb (DND) हि सेवा कार्यरत नसल्याची अर्जदाराने दक्षता घ्यावी.

६.आरक्षित गटाचे नाव, त्याचे विवरण व आवश्यक प्रमाणपत्र

आरक्षित गटाचे नाव	आरक्षित गटाचे विवरण	आवश्यक प्रमाणपत्र
अनुसूचित जाती व नवबौध्द (Scheduled Caste) (एकूण आरक्षण ११%)	**अनुसूचित जाती** याचा अर्थ भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४१ खाली, महाराष्ट्र राज्याच्या संबंधात ज्यांना अनुसूचित जाती समजण्यात आले आहे अशा जाती, वंश किंवा जमाती यामधील त्यांचा भाग किंवा गट असा आहे. अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र संगणकीय प्रणालीमध्ये नोंदणीवेळी समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे. जेणेकरुन संगणकीय प्रणालीमध्ये सादर केलेली माहिती Capture करुन पात्रता निश्चिती केली जाईल.	१.महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले अनुसूचित जाती या प्रवर्गामध्ये मोडत असल्याबाबतचा जातीचा दाखला (Caste Certificate) देणे बंधनकारक असेल. २.सदनिकेचा ताबा घेण्यापूर्वी अनुसूचित जाती या प्रवर्गात मोडत असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात वैधता (Caste Validity Certificate)प्रमाणपत्र.
अनुसूचित जमाती (Scheduled tribes) (एकुण आरक्षण ६%)	**अनुसूचित जाती** याचा अर्थ भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४२ खाली, महाराष्ट्र राज्याच्या संबंधात, महाराष्ट्र राज्यातील ज्यांना अनुसूचित जमाती म्हणून समजण्यात येते अशा जमाती किंवा जनजाती समूह असा आहे. अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र संगणकीय प्रणालीमध्ये नोंदणीवेळी समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे. जेणेकरुन संगणकीय प्रणालीमध्ये सादर केलेली माहिती Capture करुन पात्रता निश्चिती केली जाईल.	१.महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले अनुसूचित जाती या प्रवर्गामध्ये मोडत असल्याबाबतचा जातीचा दाखला (Caste Certificate) देणे बंधनकारक असेल. २.सदनिकेचा ताबा घेण्यापूर्वी अनुसूचित जाती या प्रवर्गात मोडत असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात वैधता (Tribes/ Caste Validity Certificate) प्रमाणपत्र.
भटक्या जमाती (Nomedic Tribe) (एकूण आरक्षण १.५)	**भटक्या जमाती** याचा अर्थ शासनाने तशी मान्यता दिलेल्या महाराष्ट्रतील जमाती किंवा जनजजाती समूह असा आहे. भटक्या जमातीचे प्रमाणपत्र संगणकीय प्रणालीमध्ये नोंदणीवेळी समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे. जेणेकरुन संगणकीय प्रणालीमध्ये सादर केलेली माहिती Capture करुन पात्रता निश्चिती केली जाईल.	१.महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिकाऱ्याने भटक्या जमाती या प्रवर्गामध्ये मोडत असल्याबाबतचा जातीचा दाखला (Tribes/ Caste Certificate). २.सदनिकेचा ताबा घेण्यापूर्वी भटक्या जमाती या प्रवर्गात मोडत असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात वैधता (Tribes/ Caste Validity Certificate) प्रमाणपत्र.
विमुक्त जमाती (Denotified Tribes) (एकूण आरक्षण १.५%)	**विमुक्त जमाती** याचा अर्थ शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या महाराष्ट्रातील जमाती किंवा जनजाती समूह असा आहे. विमुक्त जमातीचे प्रमाणपत्र संगणकीय प्रणालीमध्ये नोंदणीवेळी समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे. जेणेकरुन संगणकीय प्रणालीमध्ये सादर केलेली माहिती Capture करुन पात्रता निश्चिती केली जाईल.	१.महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिकाऱ्याने विमुक्त जमाती या प्रवर्गामध्ये मोडत असल्याबाबतचा जातीचा दाखला (Tribes/ Caste Certificate). २.सदनिकेचा ताबा घेण्यापूर्वी विमुक्त जमाती या प्रवर्गात मोडत असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात वैधता (Tribes/ Caste Validity Certificate) प्रमाणपत्र.

शासन परिपत्रक क्र.लोआप्र.११०९ प्र.क्र.३४९/गृनिभू-१,मंत्रालय, मुंबई दिद.०७.०५.२०१० अन्वये म्हाडा अंतर्गत अनुसूचित जाती नवबौध्दांसह, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती व विमुक्त जमाती या प्रवर्गातील अर्जदारांना वितरण करण्यात येणारे गाळे/सदनिकांचा ताबा देण्यापुर्वी संबंधित लाभार्थ्याने जात पडताळणी समितीकडून जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) सादर करणे बंधनकारक असेल. तसेच **२०% सर्वसमावेशक तथा १५% सामाजिक गृहनिर्माण योजनेतील यशस्वी लाभार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय सदनिकेचे देकारपत्र देण्यात**

<table>
<tr><td colspan="4">येणार नाही. ज्या अर्जदारांकडे समितीद्वारे निर्गमित Barcode प्रमाणपत्र उपलब्ध असेल अशा प्रमाणपत्रांची पडताळणी Online संगणकीय प्रणालीद्वारे केली जाईल. Barcode नसणारे संगणकीय प्रणालीद्वारे स्विकृत झालेले अर्जदाराने सादर केलेले प्रमाणपत्र संबंधित समीतीकडे प्रमाणपत्राची वैधता तपासण्यासाठी पाठविण्यात येईल. संबंधित समितीचा अहवाल प्राप्त झाल्यापश्चात अर्जदाराला सदनिकेचा ताबा देण्याची कार्यवाही करण्यात येईल.</td></tr>
<tr><td>पत्रकार (JR) (एकूण आरक्षण २.५%)</td><td colspan="2">पत्रकार या प्रवर्गामध्ये जे अर्जदार पत्रकारीतेच्या व्यवसायावर अवलंबून आहेत असे व्यक्ती याकरिता मुख्य जनसंपर्क अधिकारी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांनी दिलेले प्रमाणपत्र संगणकीय प्रणालीमध्ये नोंदणीवेळी समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे. जेणेकरुन संगणकीय प्रणालीमध्ये सादर केलेली माहिती Capture करुन पात्रता निश्चिती केली जाईल.</td><td>मुख्य जनसंपर्क अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा), मुंबई यांनी दिलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र.</td></tr>
<tr><td>स्वातंत्र्य सैनिक (FF) (एकूण आरक्षण २.५%)</td><td colspan="2">स्वातंत्र्य सैनिक याचा अर्थ, महाराष्ट्र सरकार किंवा भारत सरकारकडून मान्य झालेले स्वातंत्र्य सैनिकासाठी निवृत्त वेतन मिळणारी व्यक्ती किंवा भारताच्या स्वातंत्र्य मुक्तीच्या राष्ट्रीय चळवळीमध्ये सहभाग असल्याबद्दलचे प्रमाणपत्र/ सन्मानपत्र बहाल करण्यात आलेली व्यक्ती, किंवा त्यांचे वारसदार (Next-of-kin) स्वातंत्र्य सैनिकावर अवलंबून असणारी व्यक्ती जसे विधवा वा विधुर साथीदार, वडील/ आई, मुलगा नातू, मुलाची पत्नी, यापुर्वी मृत्यु पावलेल्या मुलाची/नातवाची विधवा याबाबत संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी म्हाडाने निश्चित केलेल्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र संगणकीय प्रणालीमध्ये नोंदणीवेळी सादर केलेली माहिती Capture करुन पात्रता निश्चिती केली जाईल. टिप:- स्वातंत्र्य सैनिक वा त्यांचे पश्चात वरीलप्रमाणे त्यांचे कुटुंबातील घटक व्यक्ती मिळून एकाहून अधिक सदनिका/भूखंडाचा लाभ मिळणार नाही. या आशयाचे स्वयंघोषणापत्र सादर करणे बंधनकारक आहे.</td><td>मा.जिल्हाधिकारी, यांचे प्रमाणपत्र व अर्जदाराचे स्वयंघोषणापत्र (प्रमाणपत्राचा व स्वयंघोषणा पत्राचा नमुना संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.)</td></tr>
<tr><td>दिव्यांग (Physically Handicapped Person) (एकूण आरक्षण ३%)</td><td>अंधत्व पूर्ण (Blindness)
कमी दृष्टी (low Vision)
कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured)
कर्णबधीर (Hearing Impairment)
अवयवातील कमतरता (Locomotor Disability)
मतिमंदत्व (Mental Retardation)
मनोविकृती (Mental Illness)</td><td>Certificate/ UDID Card Issued by https://www.swavlambaneard.gov.in स्वावलंबन प्रमाणपत्र संगणकीय प्रणालीमध्ये नोंदणी वेळी समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे. जेणेकरुन संगणकीय प्रणालीमध्ये सादर केलेली माहिती Capture करुन पात्रता निश्चिती केली जाईल.</td><td>https://www.swavlambaneard.gov.in द्वारे निर्गमित प्रमाणपत्र/ UDID Card.</td></tr>
<tr><td></td><td colspan="2">या प्रवर्गात संरक्षण दलातील जे कर्मचारी किंवा सीमा भागातील रस्ते बांधणी व विकास मंडळाचे जे कर्मचारी</td><td></td></tr>
</table>

